जनसंपर्क कक्ष
02 DEC 2022 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या प्रगतीसाठी योगदान देऊ : क्षीरसागर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा माजी विद्यार्थी या नात्याने या विद्यापीठाच्या प्रगतीसाठी सर्वतोपरी योगदान देऊ, अशी ग्वाही महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळाचे कार्याध्यक्ष राजेश क्षीरसागर यांनी केले. गुरुवारी दुपारी क्षीरसागर यांनी विद्यापीठास भेट देऊन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह प्रमुख अधिकाऱ्यांसमवेत विविध विषयांवर चर्चा केली.

क्षीरसागर म्हणाले, विद्यापीठाने प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थिनीला वसतिगृह प्रवेश आश्वासित केला आहे.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ येथे बैठकीत बोलताना राजेश क्षीरसागर. सोबत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के.**

जल स्वयंपूर्णतेपाठोपाठ विद्यापीठ आता सौरऊर्जेच्या आधारे ऊर्जेच्या क्षेत्रात स्वयंपूर्ण होऊ पाहते आहे. याला जिल्हा नियोजन मंडळाच्या माध्यमातून मदत करण्याबाबत विचार करता येईल. विद्यापीठाच्या जुन्या पुणे-बंगळूर महामार्गाच्या पूर्व व पश्चिम बाजू यांना जोडण्यासाठी भुयारी मार्गाची मोठी आवश्यकता आहे. विद्यापीठ हवामान बदल, गूळ संशोधन आदींबाबतही संशोधन व विकासाचे काम करत आहे. या सर्व उपक्रमांना मदत करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू. आवश्यकता भासल्यास कार्यतत्पर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशीही चर्चा करू, अशी ग्वाही दिली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी विद्यापीठाविषयी सविस्तर सादरीकरण केले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते क्षीरसागर यांचा सत्कार करण्यात आला. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. यावेळी विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, आर. वाय. लिधडे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. आर. जी. पवार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. प्रकाश गायकवाड, अभय जायभाये, अभिजित रेडेकर, डॉ. डी. के. मोरे, डॉ. धनंजय सुतार आदी अधिकारी उपस्थित होते.

02 DEC 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या प्रगतीसाठी सर्वतोपरी योगदान देणार

## राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर : शिवाजी विद्यापीठाला सदिच्छा भेट

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा माजी विद्यार्थी या नात्याने आपण या विद्यापीठाच्या प्रगतीसाठी सर्वतोपरी योगदान देऊ, विद्यापीठाने शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावांसाठी पाठपुरावा करू, अशी ग्वाही राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष, राजेश क्षीरसागर यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठाला राजेश क्षीरसागर यांनी गुरूवारी सदिच्छा भेट दिली. यावेळी झालेल्या बैठकीत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह प्रमुख अधिकाऱ्यांसमवेत त्यांनी चर्चा केली.

क्षीरसागर म्हणाले, विद्यापीठाचा मी पदवीधारक विद्यार्थी आहे. विद्यापीठाने ६० वर्षांत केलेली प्रगती गौरवास्पद आहे. नॅकचे ए प्लस प्लस मानांकन, विद्यापीठ अनुदान आयोगाचा कॅटगरी वन दर्जा, संशोधन क्षेत्रात जागतिक स्तरावरील चमकदार कामगिरी यासह प्रत्येक क्षेत्रात



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात गुरूवारी राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर यांनी बैठक घेतली. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते.**

विद्यापीठाने आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमठवला आहे. विद्यापीठाचा विद्यार्थी म्हणून याचा अभिमान आहे. विद्यापीठाचा कोणताही प्रश्न सोडवण्यासाठी तत्परतेने प्रयत्नशील राहू, असे त्यांनी स्पष्ट केले.

ते म्हणाले, विद्यापीठाने प्रवेशित प्रत्येक विद्यार्थिनीला वस्तीगृहात प्रवेश आश्वासित केला आहे. त्यामुळे विद्यार्थिनीसाठी आणखी वसतीगृहाची गरज समोर आली आहे. जलस्वयंपुर्णतेनंतर आता विद्यापीठ सौरऊर्जा क्षेत्रातही स्वयंपूर्ण होण्यासाठी प्रयत्नशील आहे. त्यासाठी जिल्हा नियोजन मंडळाच्या माध्यमातून निधीसाठी प्रयत्न केले जातील. विद्यापीठाच्या जुन्या राष्ट्रीय महामार्गाच्या पुर्व पश्चिम बाजू जोडण्यासाठी भुयारी मार्गाची आवश्यकता आहे. त्याचा प्रस्तावही तयार आहे. याचा पाठपुरावा करू. हवामान बदल, गुळ संशोधनासंदर्भात काम सुरू आहे. या सर्वांसाठी प्रयत्नशील राहू. तसेच विद्यापीठाने यासंदर्भात सादर केलेल्या प्रस्तावांसाठी आपला पाठपुरावा सुरू राहील. गरज भासल्यास यासंदर्भात मुख्यमंत्री शिंदे यांच्याशीही चर्चा करू, असे आश्वासन त्यांनी दिले.

बैठकीत प्र कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी विद्यापीठाच्या कामगिरीचे सादरीकरण केले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते क्षीरसागर यांचा सत्कार करण्यात आला.

प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी स्वागत करून आभार मानले. यावेळी परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, प्रभारी वित्त अधिकारी आर. वाय. लिधडे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. आर. जी. पवार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. प्रकाश गायकवाड, अभय जायभाये, अभिजित रेडेकर, डॉ. डी. के. मोरे, डॉ. धनंजय सुतार आदी उपस्थित होते.

सकाळ



**कोल्हापूर : बैठकीत बोलताना राज्य नियोजन मंडळाचे कार्याध्यक्ष राजेश क्षीरसागर. या वेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे आदी.**

# विद्यापीठाचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करू : राजेश क्षीरसागर

**कोल्हापूर, ता. १ :** शिवाजी विद्यापीठाचा माजी विद्यार्थी या नात्याने या विद्यापीठाच्या प्रगतीसाठी आणि प्रश्न सोडविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न व सहकार्य करू, अशी ग्वाही राज्य नियोजन मंडळाचे कार्याध्यक्ष राजेश क्षीरसागर यांनी आज दिली. क्षीरसागर यांनी आज विद्यापीठास सदिच्छा भेट देऊन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह प्रमुख अधिकाऱ्यांबरोबर विविध विषयांबाबत चर्चा केली. त्यावेळी ते बोलत होते.

क्षीरसागर म्हणाले, "विद्यापीठाच्य जुन्या पुणे-बंगळूर महामार्गाच्या पूर्व व पश्चिम बाजू यांना जोडण्यासाठी भुयारी मार्गाची आवश्यकता आहे. विद्यापीठ हवामान बदल, गूळ संशोधन आदींबाबतही संशोधन व विकासाचे काम करीत आहे. या उपक्रमांना मदत करण्यासाठी प्रयत्न करू. विद्यापीठाने या संदर्भात शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावांसाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा करू. आवश्यकता भासल्यास मुख्यमंत्री शिंदे यांच्याशीही चर्चा करू."

प्रभारी कुलसचिव व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, प्रभारी वित्त व लेखाधिकारी आर. वाय. लिधडे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. आर. जी. पवार, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना संचालक अभय जायभाये, संगणक केंद्र संचालक अभिजित रेडेकर, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. डी. के. मोरे, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार उपस्थित होते.

0 2 DEC 2022

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : औरंगाबाद येथे होणाऱ्या आंतरविद्यापीठ क्रीडामहोत्सवासाठी निवड झालेला शिवाजी विद्यापीठाचा संघ.

# आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवासाठी १४० जणांचा संघ रवाना

## औरंगाबाद येथे ३ ते ७ डिसेंबर दरम्यान होणार स्पर्धा : कुलगुरू डॉ. शिर्के यांनी दिल्या शुभेच्छा

प्रतिनिधी
कोल्हापूर

औरंगाबाद येथे ३ ते ७ डिसेंबर या कालावधीत होणाऱ्या २४ व्या आंतरविद्यापीठ क्रीडामहोत्सव–२०२२ साठी शिवाजी विद्यापीठाचा १४० जणांचा संघ गुरूवारी रवाना झाला. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी संघाला शुभेच्छा आल्या. या महोत्सवात दहा संघ व्यवस्थापक आणि दहा प्रशिक्षक यांच्याबरोबरच एकूण १२० खेळाडू विविध क्रीडा प्रकारांत सहभागी होणार आहेत. यामध्ये खो–खो, कबड्डी, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, ॲथलेटिक्स आदी खेळांचा समावेश आहे.

खेळाडूंनी आपल्या उणीवांवर मात करीत आपल्या क्षमतांचे संवर्धन करावे आणि शिवाजी विद्यापीठाचे नाव उंचावावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले. खेळाडूंनी शारीरिक क्षमतेबरोबरच आपली मानसिक क्षमताही सातत्याने वृद्धिंगत करावी, जेणेकरून खेळाकडे अधिक जागरुकतेने पाहता येऊ शकेल, असे प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी केवळ खेळावर लक्ष केंद्रित करून यंदा सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त करण्याच्या दिशेने प्रयत्न करावेत, असे आवाहन प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी केले.

यावेळी ग्रुप लीडर डॉ. सुनील चव्हाण आणि विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी केले. मार्गदर्शक डॉ. एन. डी. पाटील, डॉ. सुनील चव्हाण आणि खेळाडू प्राजक्ता चव्हाण, ऋतुजा मोरे यांनी मनोगत व्यक्त केले.

डॉ. लीना पाटील यांनी सूत्रसंचालन केले. पृथ्वीराज सरनाईक यांनी संयोजन केले. प्रा. संजय पाटील यांनी आभार मानले.

पुढारी



कोल्हापूर : गुवाहाटी विद्यापीठात आयोजित 'स्तुती' उपक्रमाच्या समारोपप्रसंगी डॉ. रंजन काकती, प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे, प्रा. उत्पल शर्मा.

# 'डीएसटी'ची गुंतवणूक ठरेल फलदायी : प्रा. सोनकवडे

कोल्हापूर : भारतातील ईशान्य भाग जगातील सर्वात जास्त जैववैविध्यपूर्ण विभागांपैकी आहे. जेथे भरपूर वनाच्छादित प्रदेश आहे. डीएसटीची गुंतवणूक फलदायी ठरेल, असे प्रतिपादन संशोधक प्रा.डॉ. आर.जी. सोनकवडे यांनी केले. गुवाहाटी विद्यापीठ (आसाम) येथे सुरू असलेल्या 'स्तुती' कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. गुवाहाटी विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाचे अधिष्ठाता, डॉ. रंजन काकती, इन्स्ट्रूमेंटेशन विभागाचे प्रमुख प्रा. उत्पल शर्मा उपस्थित होते. डॉ. काकती यांनी 'डीएसटी'च्या उत्कृष्ट उपक्रमावर भर दिला. कार्यक्रमात विद्यापीठातील व संलग्न महाविद्यालयातील सुमारे ५० संशोधक, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

0 2 DEC 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुशल मनुष्यबळासाठी स्तुती उपक्रम आवश्यक : डॉ. काकती





कोल्हापूर : डॉ. आर. जी. सोनवणे यांचे स्वागत करताना डॉ. रंजन काकती. शेजारी प्रा. उत्पल शर्मा.

**कोल्हापूर, ता. १ :** स्तुतीसारखे उपक्रम विज्ञान, संशोधनाकडे विद्यार्थ्यांना आकर्षित करणारे आहेत. देशातील कुशल मनुष्यबळ निर्मितीसाठी स्तुती उपक्रम उपयुक्त ठरेल, असे आसाममधील गुवाहाटी विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाचे डीन डॉ. रंजन काकती यांनी सांगितले. पहिल्यांदाच झालेल्या ईशान्य भारतातील स्तुती कार्यशाळेत ते बोलत होते. भारत सरकारचे विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय, शिवाजी विद्यापीठ आणि गुवाहाटी विद्यापीठ यांच्यातर्फे कार्यशाळा झाली.

शिवाजी विद्यापीठाच्या सैफ केंद्राचे प्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी कार्यशाळेचा उद्देश सांगितले. ते म्हणाले, की ईशान्येकडील अंतर्गत भागाशी संपर्क साधायचा होता. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाने येथे प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले असून, त्याला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. हा भाग सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या काहीसा मागास असला, तरीही प्रगती करण्याची इच्छा आणि प्रयत्नांमध्ये हे कधीही मागे पडत नाहीत. या ईशान्य विभागाचे देशाच्या एकूण जीडीपीपैकी २.५ टक्क्यांपेक्षा जास्त योगदान आहे. हा आकडा वाढण्यासाठी अत्याधुनिक उपकरणे व प्रशिक्षण मिळणे गरजेचे आहे. ज्यामुळे 'मेक इन इंडिया' अंतर्गत नवनवीन संशोधक, उद्योजक देशाला मिळतील. या वेळी यूएसआयसी प्रमुख प्रा. उत्पल शर्मा उपस्थित होते.

02 DEC 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मानसिक विकारमुक्तीच्या संशोधनाला पेटंट

■ आनंददायी सेरोटोनिसाठी सेन्सिंग पद्धत विकसित



सागर डेळेकर



साजिद मुल्लाणी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्रज्ञांनी मानवी शरीरातील 'आनंददायी मूलद्रव्य' सेरोटोनिनसाठी नॅनो-संयुगांच्या सहाय्याने सेन्सिंग पद्धत विकसित केली आहे. त्यासाठी डॉ. सागर डेळेकर आणि संशोधक विद्यार्थी डॉ. साजिद मुल्लाणी यांना नुकतेच भारतीय पेटंट मिळाले आहे. या संशोधनामुळे विविध मानसिक विकारांचे चांगले आणि प्रभावी निदान करता येणार आहे. डॉ. डेळेकर व डॉ. मुल्लाणी यांनी विकसित केलेली ही सेन्सिंग पद्धत अत्यंत सोपी व सुलभ आहे. याकरिता अल्पखर्चिक नॅनोसंमिश्रांवर आधारित इलेक्ट्रोडचा वापर केला. हे संशोधन २०२० मध्ये रसायनशास्त्रातील 'सायंटिफिक रिपोर्ट्स' या 'नेचर' संशोधन पत्रिकेमध्येही प्रसिद्ध झाले. यासाठी स्कॉटलंडमधील (ग्रेट ब्रिटन) संशोधन सहयोगी डॉ. लिन डेन्नी, अमेरिकेतील डॉ. अन्नदानेश शेल्लेकरी, दक्षिण कोरियातील संशोधक डॉ. नवाज मुल्लाणी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. डॉ. डेळेकर यांचे या वर्षातील हे दुसरे पेटंट आहे.

## संशोधनांतर्गत अत्यंत सुलभ व कमी खर्चिक सेरोटोनिन चाचणी

मानवी शरीरातील 'आनंददायी मूलद्रव्य' मानल्या जाणाऱ्या सेरोटोनिनच्या असंतुलनामुळे माणसाला मानसिक ताण-तणाव, नैराश्य, चिंता, निद्रेच्या समस्या, आघातानंतरची तणावपूर्ण विकृती, स्क्रिझोफ्रेनिया (मानसिक विकार), फोबिया (भीती) आदी आजार होतात. सेरोटोनिनच्या प्रमाणावर मानसिक स्वास्थ्य अवलंबून असते. याच्या असंतुलनामुळे बिघडलेल्या मानसिक संतुलनाचे प्राथमिक अवस्थेत योग्य निदान झाल्यास परिस्थिती नियंत्रणात आणता येते. यासाठी महागड्या वैद्यकीय तपासण्या कराव्या लागतात. यांना पर्याय म्हणून या संशोधनांतर्गत अत्यंत सुलभ व कमी खर्चिक सेरोटोनिन चाचणी विकसित केली.

**-डॉ. सागर डेळेकर (संशोधक प्राध्यापक)**

## सातत्यपूर्ण संशोधनाचे फलित

डॉ. सागर डेळेकर आणि डॉ. साजिद मुल्लाणी संशोधन प्रकल्पावर सन २०१८ पासून काम करीत आहेत. त्यांच्या अथक प्रयत्नामुळेच हे पेटंट मिळाले आहे. सध्या अनेक लोक मनोकायिक आजारांना बळी पडत आहेत.. या संशोधनामुळे अशा रुग्णांना दिलासा मिळेल. भविष्यात वैद्यकीय उपचारांमध्ये या पद्धतीचा वापर करता येईल. या क्षेत्रातील पुढील संशोधनही त्यांनी सुरू ठेवावे.

**-डॉ. दिगंबर शिर्के (कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)**

सकाळ

# रेशीम समन्वय समिती सदस्यपदी डॉ. ए. डी. जाधव



कोल्हापूर, ता. १ : राज्यस्तरीय रेशीम समन्वय समितीच्या सदस्यपदी डॉ. ए. डी. जाधव यांची निवड झाली आहे. केंद्रीय रेशीम मंडळातर्फे योजनेंतर्गत राज्यातील रेशीम क्षेत्रातील लाभार्थ्यांकरिता राज्यातील संशोधन व विकास, क्षमता बांधणी व प्रशिक्षण, रेशीम कीटक बीज उत्पादन बळकटीकरण, विपणन प्रणाली, गुणवत्ता प्रमाण प्रणालीच्या योजना राबविण्यात येणार आहेत. अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय रेशीम समन्वय समितीची पुनर्रचना केली आहे. त्यात डॉ. जाधव यांचा समावेश आहे.

सकाळ

# नॉनस्टीक वस्तूंच्या अतिवापराचे यकृतावर दुष्परिणाम : डॉ. आपटे

**कोल्हापूर, ता. १ :** दैनंदिन जीवनात वापरल्या जाणाऱ्या नॉनस्टीक वस्तूंमुळे यकृताचे विकार उद्‌भवण्याची शक्यता असते. त्यामुळे त्यांचा अतिवापर टाळावा, असे मत अमेरिकेतील कान्सास विद्यापीठातील फार्मेकॉलॉजी-टॉक्झिकॉलॉजी विभागातील शास्त्रज्ञ डॉ. उदयन आपटे यांनी आज व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागात 'डेसिफरिंग मॅकेनिझम्स ऑफ लीव्हर टॉक्झिसिटी इन्ड्युस्ड बाय पॉलीफ्लुरोअल्काईल सबस्टन्सेस (पीएफएएस) युजिंग ग्लोबल जीन एक्स्प्रेशन एनालिसीस' या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते.

डॉ. आपटे म्हणाले, की नॉनस्टिक भांडी, रेनकोट, वॉटरप्रूफ मेकअप उत्पादने आणि स्टेनप्रूफ कपड्यांच्या अतिवापरामुळे यकृताचे आजार होऊ शकतात. पीएफएएस रसायनांच्या अतिवापरामुळे रोगप्रतिकारक शक्ती, प्रजननक्षमता, गर्भवाढ आणि यकृतावर दुष्परिणाम होतात. कर्करोगासारखे आजारही उद्‌भवू शकतात. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे डॉ. मेघनाद जोशी, वेंगुर्ला येथील बॅ. बाळासाहेब खर्डेकर महाविद्यालयाचे डॉ. वसंत पाटोळे, डॉ. नितीन पोटफोडे, सुभाष मुंजे, डॉ. एस. एम. गायकवाड, डॉ. एस. आर. यंकची, डॉ. एम. पी. भिलावे उपस्थित होते. डॉ. माधुरी वाळवेकर यांनी प्रास्ताविक केले. अधिविभागप्रमुख डॉ. आशिष देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. एन. ए. कांबळे यांनी आभार मानले.


डॉ. उदयन आपटे

लोकमत

# विद्यापीठाचा संघ क्रीडा महोत्सवासाठी औरंगाबादला रवाना

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : औरंगाबाद येथे दि. ३ ते ७ डिसेंबरदरम्यान होणाऱ्या २४ व्या आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवासाठी शिवाजी विद्यापीठाचा १४० जणांचा संघ रवाना झाला. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत या संघाला बुधवारी शुभेच्छा देण्यात आल्या.

या महोत्सवात दहा संघ व्यवस्थापक आणि दहा प्रशिक्षक यांच्यासह एकूण १२० खेळाडू विविध क्रीडा प्रकारांत सहभागी होणार आहेत. त्यामध्ये खो-खो, कबड्डी, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, ॲथलेटिक्स, आदी खेळांचा समावेश आहे. ग्रुप लीडर डॉ. सुनील चव्हाण, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत केले. मार्गदर्शक डॉ. एन. डी. पाटील, सुनील चव्हाण, खेळाडू प्राजक्ता चव्हाण, ऋतुजा मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. लीना पाटील यांनी सूत्रसंचालन केले. पृथ्वीराज सरनाईक यांनी संयोजन केले. प्रा. संजय पाटील यांनी आभार मानले.

पुढारी

# शहाजी महाविद्यालयात उद्या व्याख्यानमाला

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि श्री छत्रपती शहाजी महाविद्यालय, इतिहास विभाग व कर्मवीर वि.रा.शिंदे संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार (दि. ३) रोजी सत्यशोधक कृष्णाजी रामजी पाटील व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुनीलकुमार लवटे 'महर्षी वि.रा.शिंदे यांच्या विचारांची प्रस्तुतता' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर.के.शानेदिवाण असणार आहेत. याप्रसंगी संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे, सचिव विजय बोंद्रे यांची प्रमुख उपस्थिती असेल. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन समन्वयक डॉ.एस.व्ही.शिखरे यांनी केले आहे.

पुढारी

# शाहू कॉलेजमध्ये सोमवारी जिल्हास्तर संशोधन महोत्सव

कोल्हापूर : रयत शिक्षण संस्थेच्या राजर्षी शाहू कॉलेजमध्ये जिल्हास्तर अविष्कार संशोधन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवारी (दि. ५) होणाऱ्या महोत्सवामध्ये शिवाजी विद्यापीठ अंतर्गत जिल्ह्यातील सर्व महाविद्यालये, अधिविभाग सहभागी होणार आहेत. स्पर्धेत कोणत्याही शाखेचा विद्यार्थी, शिक्षक सहभागी होऊ शकतो. विजेत्यांना रोख बक्षिसे व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. नाव नोंदणी शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर करण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांनी केले आहे.

पुढारी

# क्रीडा महोत्सवासाठी विद्यापीठाचा संघ रवाना

कोल्हापूर : औरंगाबाद येथे ३ ते ७ डिसेंबर या कालावधीत होणाऱ्या २४ व्या आंतरविद्यापीठ क्रीडामहोत्सवासाठी शिवाजी विद्यापीठाचा १४० जणांचा संघ गुरुवारी रवाना झाला. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली सदिच्छा समारंभ झाला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. एन.डी. पाटील, डॉ. सुनील चव्हाण आदी उपस्थित होते.